## ह्या अटी लागू आहेत+

| | |
|---|---|
| नूतनीकरणाचा लाभ | मागील पॉलिसीच्या अंतिम मुदतीच्या तारखेपासून 30 दिवसांचे आत नूतनीकरण केल्यासच फक्त उपलब्ध आहे . |
| सह–भरणा | भौगोलिक गुणांकन यंत्रणा सादर करण्यात येत आहे म्हणजे झोन ए (महाराष्ट्र, गुजरात, दिल्ली, हरयाणा, उत्तर प्रदेश आणि बंगलोर) आणि झोन बी (उर्वरित भारत). जर झोन बी मधील ग्राहकाने झोन ए मध्ये दावा केला तर तो 25% सहभरणा करण्यास पात्र असेल. परंतु, झोन बी मध्ये राहणारे ग्राहक झोन ए साठी लागू असलेली योग्य प्रिमियमची रक्कम भरण्याची निवड करू शकतात आणि कोणतीही सहभरणा रक्कम न भरता संपूर्ण भारतात कोठेही उपचार घेऊ शकतात. |

## पॉलिसी रद्द करणे (मोफत पाहणी व्यतिरिक्त)

पॉलिसीधारक 15 दिवसांची आगाऊ सूचना देऊन पॉलिसी रद्द करू शकेल आणि अशा परिस्थितीत, कंपनी न संपलेल्या पॉलिसीच्या कालावधीसाठी अल्पकालावधी पद्धतीने प्रिमियमची रक्कम परत करेल आणि खाली तपशीलवार नमूद केल्याप्रमाणे जोखमीच्या कालावधीच्या %नुसार प्रिमियमची रक्कम परत करण्यात येईल.

| जोखीम कालावधी | परत करण्यात येणाऱ्या प्रिमियमचे % |
|---|---|
| 1 महिना पर्यंत | 75% |
| 3 महिनेपर्यंत | 50% |
| 6 महिनेपर्यंत | 25% |
| 6 महिन्यांपेक्षा अधिक | काही नाही |

+समाविष्ट आरोग्याचा संपूर्ण तपशील, नियम व अटी, यासाठी कृपया माहितीपुस्तिका आणि पॉलिसीचे शब्दांकन काळजीपूर्वक वाचा.

रिलायन्स हेल्थवाईज पॉलिसी UIN: RELHLIP21522V032021

## प्रतिक्षा कालावधी

| | |
|---|---|
| **पहिल्या 30 दिवसांचा प्रतिक्षा कालावधी** | अपघाताव्यतिरिक्त इतर कोणत्याही आजारावरील उपचारांसाठी पॉलिसीच्या प्रारंभाच्या तारखेपासून 30 दिवस. |
| **अगोदर असलेल्या आजारांसाठी प्रतिक्षा कालावधी** | पीईडीवरील उपचारांच्या खर्चासाठी 2/4 वर्ष प्रतिक्षा कालावधी आणि पहिल्या पॉलिसीच्या प्रस्थापनेपासून ओळीने संरक्षण घेतल्यास त्यामुळे उद्भवणाऱ्या गंभीर समस्या वगळण्यात येतील (पॉलिसीच्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे). |
| **खास प्रतिक्षा कालावधी** | पॉलिसीच्या शब्दांकनात नमूद केलेल्या स्थितीवरील उपचार, शस्त्रक्रिया/उपचार यांच्याशी संबंधित खर्चासाठी 1 वर्ष प्रतिक्षा कालावधी लागू आहे. पहिल्या पॉलिसीच्या प्रस्थापनेपासून ओळीने 24 वर्ष संरक्षण घेणे आवश्यक आहे. |

## तुमचे पात्रता निकष तपासून पहा+

18 वर्ष ते 65 वर्ष ह्या दरम्यानच्या व्यक्ती प्रस्तावकर्ता म्हणून पॉलिसी घेऊ शकतात. अवलंबित मुले (म्हणजे नैसर्गिक किंवा कायद्याने दत्त घेतलेली आणि प्रस्तावकर्त्यावर आर्थिक बाबतीत अवलंबित मुले) यांना 91 दिवस ते 25 वर्ष वयापर्यंत संरक्षण मिळू शकेल. जीवनभर नूतनीकरण उपलब्ध.

स्वत:साठी आणि कुटुंबातील खालील सदस्यांसाठी पॉलिसी घेता येईल:

- ए. कायद्याने विवाहित पतीपत्नी
- बी. अवलंबित मुले (91 दिवस ते 25 वर्ष ह्या वयोगटातील नैसर्गिक किंवा कायद्याने दत्त घेतलेली मुले).

वय म्हणजे पहिली पॉलिसी जारी केली त्या तारखेला किंवा नूतनीकरणाच्या वेळी ''मागील वाढदिवसाला असलेले वय.'' जर प्रस्तावाच्या टप्यात वयात काही बदल झाल्यास, प्रिमियमचा हिशोब करण्यासाठी प्रस्ताव प्रपत्र सादर करण्याच्या वेळी असलेले ''वय'' विचारात घेण्यात येईल.

ही पॉलिसी व्यक्ती आणि/किंवा कुटुंबाला जारी करण्यात येईल.

निरंतर नूतनीकरण केल्यास संरक्षण रद्द होण्याचे कोणतेही कमाल वय नाही.

व्यक्तिगत पॉलिसी: एका व्यक्तिगत पॉलिसीत एका व्यक्तिगत हमी रकमेच्या पद्धतीने जास्तीत जास्त 4 सदस्यांना संरक्षण देता येईल.

फ्लोटर पॉलिसी: फॅमिली फ्लोटरच्या बाबतीत, एक फॅमिली एक हमी रक्कम घेऊ शकते. एका कुटुंब फ्लोटर पॉलिसीमध्ये 4 सदस्यांना म्हणजे विमित व्यक्तींना संरक्षण देता येईल, ज्यात कायद्याने विवाहित पतीपत्नी आणि दोन अवलंबित 25 वर्षापर्यंत वयाच्या मुलांचा समावेश असेल.

## आमच्या पेनीवाईज योजनेअंतर्गत नियोजन करा

| हमी रक्कम | ₹ 1,00,000 ₹ 2,00,000 | ₹ 3,00,000 ₹ 400,000 | ₹ 5,00,000 |
|---|---|---|---|
| **फायदे** | **स्टॅण्डर्ड योजना** | **सिल्वर योजना** | **गोल्ड योजना** |
| रूग्णालयात दाखल होणे | होय – 24 तासांपेक्षा अधिक काळ रूग्णालयात दाखल झाल्यास त्याचा खर्च समाविष्ट आहे. | | |
| डेमिसिलियरी रूग्णालयातील वास्तव्य | होय – 10% पर्यंत हमी रकमेइतके मर्यादित, घरी वैद्यकीय उपचार घेण्यासाठी केलेला वैद्यकीय खर्चासाठी, ज्यासाठी अन्यथा रूग्णालयात दाखल व्हावे लागले असते. | | |
| रूग्णालयात दाखल होण्या अगोदरचा वैद्यकीय खर्च | 30 दिवस | 60 दिवस | 60 दिवस |
| रूग्णालयातील वास्तव्यानंतरचा वैद्यकीय खर्च | 60 दिवस | 90 दिवस | 90 दिवस |
| अगोदर असलेले आजार | ओळीने 4 वेळा नूतनीकरण केल्यानंतर | ओळीने 2 वेळा नूतनीकरण केल्यानंतर | ओळीने 2 वेळा नूतनीकरण केल्यानंतर |
| आरोग्याच्या तपासणीचा खर्च | होय – ओळीने 4 वर्षांच्या ब्लॉकमध्ये कोणत्याही विमित व्यक्तीने पॉलिसी अंतर्गत कोणताही दावा केला नसेल तर ब्लॉकच्या अखेरीस, व्यक्तिगत पॉलिसीजसाठी सरासरी हमी रकमेच्या 1% पर्यंत आणि फ्लोटर संरक्षणासाठी 1.25% पर्यंत वैद्यकीय तपासणीच्या खर्चाची प्रतिपूर्ती दिली जाते. | | |
| गंभीर आजार | नाही | नाही | होय |
| दान करणाऱ्या व्यक्तीचा खर्च | नाही | होय | होय |
| आधुनिक उपचार | होय – हमी रकमेच्या 50% पर्यंत संरक्षण | | |

## तुमच्यासाठी अधिक मूल्य

| फायदे | स्टॅण्डर्ड योजना | सिल्वर योजना | गोल्ड योजना |
|---|---|---|---|
| दैनंदिन रूग्णालय वास्तव्य भत्ता*+ | नाही | नाही | 7 दिवस पर्यंत प्रतिदिन ₹250<br>रु.250 प्रतिदिन 14 दिवसपर्यंत (यादीतील गंभीर आजार झाल्यास) |
| सुश्रृषा भत्ता (प्रतिदिन रक्कम) | नाही | जास्तीत जास्त 5 दिवसांच्या कालावधीसाठी प्रतिदिन ₹250 | जास्तीत जास्त 5 दिवसांच्या कालावधीसाठी प्रतिदिन ₹300<br>रु.300 प्रतिदिन 10 दिवसपर्यंत (यादीतील गंभीर आजार झाल्यास) |
| स्थानिक रस्ता रूग्णवाहिका सेवा (एकदा रूग्णालयात दाखल करण्यासाठी) | ₹500/– पर्यंत | ₹750/– पर्यंत | ₹1000/– पर्यंत |
| आजार निवारण लाभ | नाही | होय – विमित व्यक्तीला 10 दिवसांपेक्षा अधिक काळ रूग्णालयात रहावे लागले तर ₹10,000 इतकी ठोस रक्कम देण्यात येईल. | |
| सोबतच्या व्यक्तीचा खर्च (प्रतिदिन रक्कम) | जास्तीत जास्त 5 दिवसांच्या कालावधीसाठी प्रतिदिन ₹200 | जास्तीत जास्त 5 दिवसांच्या कालावधीसाठी प्रतिदिन ₹250 | जास्तीत जास्त 5 दिवसांच्या कालावधीसाठी प्रतिदिन ₹300 |

*+दैनंदिन रूग्णालय वास्तव्य भत्ता दिवस 4 पासून

Digital India Power To Empower | RELIANCE GENERAL INSURANCE | CSC e-Governance Services India Limited

हेल्थ इन्शूरन्स

# रिलायन्स हेल्थवाईज पॉलिसी

## लवकर निर्णय घ्या आणि चटकन विमा काढा, सुज्ञ बनण्याची आणि आपले आरोग्य सुरक्षित राखण्याची हीच योग्य वेळ आहे

Tech+ ❤ = Live Smart





आपल्या जीवनशैलीत अनेक वेळा बाहेर खाणे, उशीरा झोपणे, नियमित व्यायाम न करणे आणि रात्री बाहेर रहावे लागणे या गोष्टी समाविष्ट असतात. आपल्या आयुष्यातील ह्या गोष्टींचा आपण आनंद घेत असतो, कारण जीवनाचा आनंद घेण्याची हीच योग्य वेळ असते, परंतु पुढे कालांतराने ह्या सर्व निष्काळजीपणाने वागण्याला शरीर प्रतिसाद देऊ लागते. आणि जेव्हा तसा प्रतिसाद मिळू लागतो तेव्हा त्यातून लवकर बरे वाटावे अशी तुमची इच्छा असते आणि तुम्हाला कोणत्याही त्रासाविना सेवा देणाऱ्या विमा पॉलिसीची गरज असते जी तुमच्या कठिण प्रसंगात तुम्हाला मदत करेल असे तुम्हाला वाटत असते. म्हणूनच, रिलायन्स जनरल इन्शूरन्स आपल्यासाठी एक विमा पॉलिसी सादर करत आहे जी तुम्हाला चटकन सेवा मिळावी यासाठी तंत्रज्ञानाची सुविधा देऊ करते व त्याचबरोबर उत्तम सेवा देते कारण तुमच्या बचतीला कोणताही धोका न पोहोचता तुम्हाला हव्या असलेल्या सेवेची तिला जाणिव असते.

**रिलायन्स हेल्थवाईज पॉलिसी हा Tech + ❤ सह**
***Live* Smart चा नवा मार्ग.**

## आमची निवड करण्याची 5 कारणे

### अधिक जागा, मर्यादा नाही
कोणत्याही प्रकारच्या वैद्यकीय आणीबाणीच्या पसंगी, योग्य पकारची सेवा मिळणे याला तुम्ही प्रथम प्राधान्य द्याल, आणि जलद बरे होण्यासाठी व अधिक चांगले उपचार मिळण्यासाठी रुग्णालयाची रूम निवडण्याचा पर्याय असल्यास तो अधिक फायदेशीर ठरतो. म्हणूनच तुमच्या हेल्थ वाईज पॉलिसीमध्ये रुग्णालयाच्या रूमच्या भाड्यावर कोणतीही मर्यादा नाही. त्यामुळे तुम्हाला ज्या प्रकारची रूम हवी त्याची तुम्ही निवड करू शकता आणि कोणतीही मर्यादा न घालता तुम्ही घेतलेल्या विम्याइतके आम्ही त्याला संरक्षण देतो.

### एच म्हणजे हॉस्पिटल एच म्हणजे होम
डोमिसिलियरी (निवासी) हॉस्पिटलायझेशन हा असाच एक फायदा आहे ज्यामध्ये रूग्णाला त्याच्या स्थितीमुळे जर रूग्णालयात नेता येत नसेल किंवा विमित व्यक्तीला दाखल करून घेण्यासाठी रूग्णालयात जागा नसेल तर तुम्हाला घरी उपचार घेण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### केवळ किती दिवस सेवा नाही तर दिवस सेवा देखील
ह्या आरोग्य पॉलिसीत आंतररूग्ण रूग्णालयातील वास्तव्यासाठी संरक्षण आहे ज्यात किमान 24 तास रूग्णालयात रहावे लागते आणि तुम्हाला रूग्णालयाच्या शुल्कासाठी (रूम, बोर्डिंग आणि ऑपरेशन थिएटर), डॉक्टरांचे शुल्क, वैद्यकीय चाचण्या, औषधे वगैरेसाठी विम्याचे संरक्षण दिले जाते. परंतु आम्हाला माहित आहे की काही उपचार पद्धती तंत्रज्ञानातील सुधारणांमुळे जलद आणि वेगवान आहेत आणि त्यासाठी 24 तास रूग्णालयात रहावे लागत नाही. त्यामुळे, आम्ही रूग्णालयात किंवा दिवस सेवा केंद्रावर घेतलेल्या अशा पद्धतींचा दिवस सेवा पद्धतीं अतर्गत* समावेश करतो.

### रोबोटिक्स, स्टेम सेल आणि सर्वकाही विशेष
वैद्यकीय विज्ञानाची इतकी प्रगती झाली आहे त्यामुळे तुमच्या आरोग्य पॉलिसीची देखील प्रगती झाली पाहिजे आणि म्हणूनच, आम्ही रोबोटिक शस्त्रक्रिया, स्टेमसेल उपचार, बलून सिनोप्लास्टी वगैरे सारख्या कमी छेद देऊन केल्या जाणाऱ्या आणि ज्यामुळे रूग्ण जलद बरा होतो अशा विशेष^ उपचारांच्या खर्चासाठी 50% पर्यंत हमी रकमेचे संरक्षण देतो.

### 30/60 किंवा 60/90, तुम्ही निवड करा
हेल्थ वाईज पॉलिसीधारक या नात्याने तुमच्या पॉलिसीच्या योजनेत तुम्ही रूग्णालयातील वास्तव्याच्या 30 दिवस अगोदर आणि 60 दिवस नंतर अशी निवड करू शकता किंवा तुम्हाला रूग्णालयातील वास्तव्याच्या 60 दिवस अगोदर आणि 90 दिवस नंतर असा पर्याय देखील उपलब्ध असेल. ह्या लाभात तुमच्या रूग्णालयातील वास्तव्याच्या अगोदर संबंधित वैद्यकीय खर्च समाविष्ट असेल आणि डिस्चार्जच्या तारखेपासून ज्यासाठी रूग्णालयातील वास्तव्यासाठी दावा केला होता अशा आजाराशी संबंधित वैद्यकीय खर्च समाविष्ट असेल.

## आणि तुमचे मत अधिक बळकट करण्यासाठी काही अधिक मुद्दे

### आम्ही जवळ आहोत आणि कॅशलेस
सर्वोत्कृष्ट उपचारांसाठी आणि लवकर बरे होण्यासाठी आम्ही तुम्हाला भारतात कोठेही, तुमच्या घराच्या जवळ किंवा दूर कॅशलेस दावा सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या 7300+ रूग्णालयाच्या नेटवर्कमधून तुमच्या रूग्णालयाची निवड करण्याचे स्वातंत्र्य देतो.

### कारण आरोग्यावर लक्ष ठेवणे देखील महत्त्वाचे असते
ओळीने 4 वर्षांच्या ब्लॉकमध्ये कोणत्याही विमित व्यक्तीने पॉलिसी अंतर्गत कोणताही दावा केला नसेल तर ब्लॉकच्या अखेरीस, आम्ही व्यक्तिगत पॉलिसीजसाठी हमी रकमेच्या 1% पर्यंत आणि फ्लोटर संरक्षणासाठी हमी रकमेच्या 1.25% पर्यंत वैद्यकीय तपासणीच्या## खर्चाची प्रतिपूर्ती देतो.

### काय गंभीर आहे हे आम्हाला समजते
गंभीर आजाराचे निदान लागल्यास त्यामुळे किती तणाव होतो हे आम्हाला माहित आहे आणि म्हणून त्यात आर्थिक ताण अधिक आर्थिक ताण पडू नये असे आम्हाला वाटते, म्हणून आम्ही योजनेत असा पर्याय देतो ज्यात यादीतील गंभीर आजारांवरील** उपचारांसाठी हमी रकमेइतकी हॉस्पिटलायझेशन अंतर्गत घेतलेली अधिक रक्कम रक्कम दिली जाते, ज्याचे प्रथम निदान आणि उपचार पॉलिसीच्या प्रारंभाच्या तारखेपासून 30 दिवसांनंतर झाले असले पाहिजेत.

### निरोगी आणि तरूण, यांना चाचण्यांची गरज नाही
तुम्हाला जर आरोग्याला पूरक सवयी असतील आणि तुम्हाला कोणताही मुळात आजार नसेल तर हेल्थवाईज पॉलिसी घेण्यासाठी 45 वर्षापेक्षा कमी वय असेल तर तुम्हाला पॉलिसीच्या अगोदर कोणत्याही वैद्यकीय चाचण्या करून घेण्याची आवश्यकता नाही.

### करबचत पुन्हा तुमच्या खिशात येऊन पडते
ह्या पॉलिसीत तुम्हाला करलाभ दिला जातो. आयकर कायदा, 1961 मधील कलम 80डी अंतर्गत तुम्ही भरलेली प्रिमियमची रक्कम कर वजावटीस पात्र आहे. ह्या लाभासंबंधी अधिक माहितीसाठी तुमच्या कर सल्लागाराचा सल्ला घ्या.
टीप: कर कायद्यात बदल होऊ शकतात.

*पॉलिसीच्या शब्दांकनात नमूद केलेल्या उपचार पद्धतींच्या अधीन.
^कृपया समाविष्ट विशेष उपचारांच्या संपूर्ण यादीसाठी पॉलिसीचे शब्दांकन पहा.
##व्यक्तिगत पॉलिसीज नमूद केलेल्या मर्यादा प्रत्येक विमित व्यक्तीला लागू आहेत आणि फ्लोटर संरक्षणात नमूद केलेल्या मर्यादेत सर्व सदस्यांसाठी उपलब्ध असलेल्या एकुण मर्यादा समाविष्ट आहेत.
**योजने अंतर्गत गंभीर आजाराच्या संरक्षणासाठी कृपया पॉलिसीचे शब्दांकन पहा. एकदा दावा स्वीकारण्यात आला आणि पैसे देण्यात आले की, त्या व्यक्तीसाठी भविष्यातील सर्व नूतनीकरणांसाठी ह्या विभागांच्या अंतर्गत संरक्षण उपलब्ध नसेल.

## सूट, सूट आणि अधिक सूट

### मुलींसाठी सूट
आम्ही मुलींच्या पाठीशी असतो! 2 प्रौढ + 2 बालकांच्या फ्लोटर पॉलिसीत तुम्ही जर तुमच्या दोन कन्यांना संरक्षण दिल्यास आम्ही 7% सूट देतो आणि पॉलिसीत एका कन्येला संरक्षण दिल्यास आम्ही 4% सूट देतो (एकतर 2 प्रौढ + 1 बालक किंवा 2 प्रौढ + 2 बालके).

### नूतनीकरणासाठी सूट
तुम्ही तुमच्या आरोग्याची काळजी घ्यावी अशी आमची इच्छा आहे, म्हणूनच तुम्ही निरोगी राहिल्यास आम्ही तुम्हाला बक्षिस देतो. प्रत्येक दावामुक्त नूतनीकरणासाठी, आम्ही लागू प्रिमियमवर 5% सूट देतो. ओळीने 4 दावा मुक्त वर्षांसाठी आणि जास्तीत जास्त 20% पर्यंत ही सूट लागू आहे.

इंटरनेटच्या माध्यमातून किंवा टेले-मार्केटिंगद्वारा पॉलिसी खरेदी केल्यास प्रिमियमवर 12% सूट लागू आहे.

टीप: एकुण सर्व सवलतींची रक्कम 37% पेक्षा जास्त होता कामा नये.

## पॉलिसीमध्ये सर्व काही समाविष्ट आहे फक्त ह्या गोष्टी नाहीत^

रिलायन्स जनरल इन्शूरन्समध्ये आम्ही पारदर्शकतेवर विश्वास ठेवतो. तुम्हाला दावा करताना कोणत्याही अचानक समोर येणाऱ्या अप्रिय गोष्टींना सामोरे जावे लागू नये यासाठी पॉलिसीतील काही प्रमुख वगळण्याच्या मुद्यांवरून एक नजर टाका:

- तपासण्या आणि मूल्यमापन/निरोगीपणाची तपासणी आणि कायाकल्प
- पुरवणी आहार आणि पदार्थ
- कॉस्मेटिक व प्लॅस्टिक सर्जरी
- धोकादायक किंवा साहसी खेळ
- कायद्याचे उल्लंघन
- अंमली पदार्थ आणि अल्कोहोल
- रिफ्रॅक्टिव एरर (अपवर्तक दृष्टीदोष)
- वंध्यत्व व षंढत्व
- प्रसुतीचा खर्च
- दातांचे उपचार
- बाह्य जन्मत: दोष
- ॲलोपथी व्यतिरिक्त/शाखांबाहेरील उपचार
- स्वत: केलेली ईजा किंवा आत्महत्या
- अणूहल्ला/युद्ध

^ही यादी फक्त निर्देशक स्वरूपाची आहे. सर्वसाधारण व कायमस्वरूपी वगळण्याचे मुद्दे तपशीलवार समजून घेण्यासाठी आमच्या वेबसाईटवर www.reliancegeneral.co.in येथे उपलब्ध असलेले प्रॉस्पेक्टस/पॉलिसीचे शब्दांकन वाचा.

## दाव्या करण्याचे सुलभ टप्पे

तुमच्या हेल्थकार्डावर दिलेल्या 1800 3009 ह्या हेल्पलाईन क्रमांकाचा उपयोग करून रूग्णालयात दाखल झाल्याची माहिती आमच्या आरकेअर आरोग्य दावा संघाला कळवा.

आरकेअरकडे आवश्यक दस्तऐवज सादर करा

**नेटवर्क हॉस्पिटल –** आरकेअर कॅशलेस फॅसिलिटीसाठी व्यवस्था करतील.
**नॉन-नेटवर्क हॉस्पिटल –** खर्चाच्या भरपाईच्या दाव्यांसाठी कृपया आमच्या पॉलिसीच्या लिखाणामध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेचा अवलंब करा.

**स्मार्ट चॉइस करण्यासाठी, आमच्याशी त्वरित येथे संपर्क साधा!**

| | |
|---|---|
| वेबसाईट | reliancegeneral.co.in |
| संपर्क | 1800 3009 (टोल फ्री)<br>022-4890 3009 (सशुल्क)<br>**022-33834185 (सशुल्कासह) – वरिष्ठ नागरिकांसाठी खास लाईन** |
| व्हॉटसॲप | 74004 22200 |

**आमच्या इन्शूरन्स सल्लागाराशी संपर्क साधा**

ब्रोबॉट वेग हवा आहे? आमच्याबरोबर डिजिटल पद्धतीने काम करा.

Reliance Selfi

App Store

Google Play

**सूट देण्यास प्रतिबंध – विमा कायदा, 1938 मधील कलम 41, विमा कायदा (सुधारित) कायदा, 2015 द्वारा सुधारणा करण्यात आल्यानुसार**
कोणतीही व्यक्ती भारतातील जीवन किंवा मालमत्ता ह्यांच्याशी संबंधित जोखमींच्या संदर्भात विमा काढण्यासाठी किंवा त्याचे नूतनीकरण करण्यासाठी किंवा तो सुरू ठेवण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणतेही आमिष देण्याची परवानगी देणार नाही किंवा परवानगी देऊ करणार नाही, देय कमीशनमध्ये किंवा त्याच्या कोणत्याही हिस्यात किंवा पॉलिसीवर दर्शविण्यात आलेल्या हफ्त्यात, कोणतीही सूट देऊ करणार नाही, किंवा पॉलिसी घेणारी, किंवा तिचे नूतनीकरण करणारी किंवा ती सुरू ठेवणारी कोणतीही व्यक्ती विमा कंपनीच्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीपत्रकानुसार किंवा तक्त्यानुसार परवानगी असलेल्या देण्यात येणाऱ्या सूट व्यतिरिक्त, कोणतीही सूट स्वीकारणार नाही. ह्या कलमातील तरतुदींची पूर्तता करण्याच्या बाबतीत एखाद्या व्यक्तीने काही हलगर्जीपणा केल्यास, त्याला दंड केला जाईल, जो ₹10,00,000/- पर्यंत वाढविला जाऊ शकतो.
फायदे, संरक्षण, नियम व अटी आणि वगळण्याचे मुद्दे यासंबंधी संपूर्ण माहितीसाठी, www.reliancegeneral.co.in वेबसाईटला भेट द्या आणि विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी विक्रीची माहिती पुस्तिका, प्रॉस्पेक्टस आणि पॉलिसीचे शब्दांकन काळजीपूर्वक वाचा. कर कायदे बदल होण्याच्या अधीन आहेत.
**आयआरडीएआय नोंदणी क्र. 103. रिलायन्स जनरल इन्शूरन्स कंपनी लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय आणि कॉर्पोरेट कार्यालय: रिलायन्स सेन्टर, दक्षिण विंग, 4था मजला, पश्चिम दृतगती मार्गाजवळ, सांताक्रूज (पूर्व), मुंबई-400 055. कॉर्पोरेट ओळख क्रमांक: U66603MH2000PLC128300. रिलायन्स हेल्थवाईज पॉलिसी UIN: RELHLIP21522V032021. वर दर्शविण्यात आलेले ट्रेड लोगोज हे अनिल धिरूभाई अंबानी व्हेन्चर्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मालकीचे आहेत आणि रिलायन्स जनरल इन्शूरन्स कंपनी लिमिटेड द्वारा त्याचा परवान्यांतर्गत उपयोग करण्यात येत आहे. फक्त तिसऱ्या पक्षासाठी दर स्थिर आहेत.* कृपया कोणताही शब्द किंवा अर्थ स्पष्ट समजून घेण्यासाठी इंग्रजी माहितीपुस्तिका पहा*

आम्हाला येथे भेटा

**An ISO 9001:2015 Certified Company**

RGI/MCOM/CO/Reliance HealthWise Policy/BR/VER.1.0/120121.